# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२६/M/०००३२**

**अपिलार्थी श्री. उत्तम खरात**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी**
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,मादाम कामा मार्ग,
हुतात्मा चौक,मंत्रालय, मुंबई ३२

**प्रथम अपिलीय अधिकारी**
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,मादाम कामा मार्ग,
हुतात्मा चौक,मंत्रालय, मुंबई ३२

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १२.१०.२०२६</u>**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०३.११.२०२५ | ०७.११.२०२५ | ०३.१२.२०२५ | ०९.०१.२०२६ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०५.०१.२०२६ रोजीच्या अर्जांन्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित केलेले नाहीत असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलार्थी यांनी दि. ०३.११.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:-

*"तनिष उन्नती सह. गृहनिर्माण संस्था, ता. खेड जि. पुणे या संस्थेची सोबतच्या माहितीसह प्रमाणित प्रती:- (१) संस्थेची नियमावली, (२) मागील ५ वर्षाचे ऑडीट रिपोर्ट (३) मागील १० वर्षातील संस्थेची निवडणूक बाबतीची संपुर्ण नस्ती (४) मागील ४ वर्षाचे संस्थेतील AGM चे इतिवृत्त व ठराव (५) संस्थेने ऑडीट करणेसाठी विशेष लेखा परिक्षक कार्यालयाकडे संस्थेदरम्यान झालेला पत्र व्यवहार (६) सर्वसाधारण सभेची मिटींग बोलविण्याबाबच्या नोटीसीचे परिशिष्ट (७) संचालक मंडळातील पदाधीकारी यांची नावे व पदनाम यादी इ. माहिती."*

जन माहिती अधिकारी उत्तर न दिल्याने अपिलार्थींनी दि. ०३.१२.२०२५ रोजी प्रथम अपील दाखल केले.

३. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी आयोगास सादर केले की, अपिलार्थीनी मागितलेली माहिती विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांच्याशी संबंधीत असल्याने माहिती अर्ज त्या कार्यालयाकडे वर्ग करुन दि. ०७.११.२०२५ रोजी

..२/-

अपिलार्थींना कळविले होते. जेव्हा अपिलार्थींनी सहकारी विभागाकडे प्रथम अपील दाखल केले तेव्हा आयोजित केलेली सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित होते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थींनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या अभिलेखावर उपलब्ध नाही असे नमुद करुन दि.०९.०१.२०२६ रोजी प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

४. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थींना उत्तर देण्यात आलेले आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : १३.१०.२०२६**

State Information Commission
Greater Mumbai